**मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत मत्स्यव्यवसाय**
**<u>विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि-२४०८/प्र.क्र. १५४/ पदुम-१३**
**मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २४ ऑक्टोबर, २००८.**

**वाचा :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक : मत्स्यवि २४०७/ प्र.क्र. १९२/पदुम-१३, दि. १५.०१.२००८**
**२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग, क्रमांक, मत्स्यवि २४०८/ प्र.क्र १४२/पदुम-१३, दि.१५.९.२००८**

**<u>शासन निर्णय :-</u>**

मराठवाडा विकास पॅकेज अंतर्गत मत्स्यव्यवसाय विकासासाठी ‘‘मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरणासाठी अर्थसहाय्य’’ हि योजना राबविण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दि. १५.१.२००८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर योजना राबविण्यासाठी सन २००८-०९ साठी रु ८०.०० लक्ष तरतूद पुरविण्यात मागणीद्वारे मंजुर करण्यात आली आहे. हा खर्च करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनेंतर्गत जास्तीत जास्त मत्स्यव्यवसाय संस्थांना योजनेचा फायदा मिळावा यादृष्टीने लाभार्थी संस्थांची निवड करणे व त्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था (मत्स्य) यांनी आयुक्त मत्स्य यांचे मान्यतेने निकष निश्चित करावेत व त्यानुसार संस्थांना अर्थसहाय्य देण्यात यावे.

३. मराठवाडा विकास पॅकेज अंतर्गत मंजूर कार्यक्रमानुसार मंजूर निधी कोषागारातून काढणे व वितरीत करणे याकरिता संबंधीत जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व प्रादेशिक उपआयुक्त मत्स्य, औरंगाबाद यांना नियंत्रण अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

सदरची योजना प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, औरगाबाद यांचे मार्फत राबविली जाईल. यासाठी प्रादेशिक विभागाने एक कृति आराखडा तसेच हा आराखडा राबविण्यासाठी ऑपरेशन गाईड लाईन्स तयार करावे.

५. सदर पॅकेज अंतर्गत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या बळकटीकरणासाठी अर्थसहाय्य या कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करणे व संनियंत्रण करणे यांची जबाबदारी शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि २४०८/प्र.क्र.१४२/पदुम-१३, दिनांक १५.९.२००८ अन्वयें नियुक्त अंमलबजावणी समिती व संनियंत्रण समिती यांची राहील. या समित्यांनी मंजूर कार्यक्रमानुसार वेळोवेळी आढावा घेवुन कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण करावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबासाईट (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८१०२४१६१११९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( शु.अ.गद्रे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्सवसाय विभाग

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,
आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती )
प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद,
विभागीय आयुक्त, औरंगाबाद, लातुर
मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातुर

जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर

महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता) ( लेखा परिक्षा ), महाराष्ट्र – २, नागपुर
जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातुर

नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२
निवड नस्ती.